**दि. १२/११/२०२० रोजी मा. श्री. संदीप कदम, जिल्हाधिकारी, भंडारा यांचे अध्यक्षतेखाली संपन्न जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृतांत**

दि. १२/११/२०२० रोजी मा. श्री. संदीप कदम, जिल्हाधिकारी, भंडारा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे दुपारी३:०० वाजता जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा घेण्यात आली. सभेत खालीलप्रमाणे अधिकारी व औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी हजर होते.

१ श्री. अशोक कुंभलवार, व्यवस्थापक, जिल्हाअग्रणी बँक, भंडारा

२ श्री व्ही. पी. तांबे, राज्यकर अधिकारी, GST कार्यालय भंडारा

३ विजय चौधरी, प्रतिनिधी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, भंडारा

४ श्री हर्षवर्धन हरडे, भंडारा राईस क्लस्टर, भंडारा

५ श्री शिरीष निर्वाण, माउली अगरबत्ती क्लस्टर, भंडारा

६ श्री लक्ष्मीकांत भुरे, माउली अगरबत्ती क्लस्टर, भंडारा

७ श्री एच. के. बदर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा

८ श्री एस. आर. तिवारी, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा

याशिवाय श्री संभाजी चव्हाण, जॉईन्ट डायरेक्टर जनरल, फॉरेन ट्रेड, नागपूर, श्रीमती शालीया इक्का, सीनिअर स्टस्टीटीकल ओफिसर MSME नागपूर व श्री के. बी. इरफाते, asistant director, MSME , नागपूर हे google meet द्वारे online पद्धतीने सभेस उपस्थित होते.

सभेचे सुरुवातीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा यांनी महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय दि. १९ ऑक्टोम्बर २०२० नुसार गठीत करण्यात आलेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे उदेशाविषयी प्रस्तावना केली.

त्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातून निर्यात होत असलेले तांदूळ व अगरबत्ती उत्पादनाविषयी भंडारा राईस क्लस्टर व अगरबत्ती क्लस्टर यांचे प्रतिनिधीकडून माहिती घेतली.

भंडारा डीस्ट्रीक्ट राइस क्लस्टरचे श्री. हर्षवर्धन हरडे यांनी भंडारा जिल्ह्यातून वार्षिक ३०० ते ४०० कोटी रुपयाचा तांदूळ निर्यात होत असल्याचे सांगितले. त्यांनी पवनी येथे केंद्रशासन पुरस्कृत समूह विकास योजनेंतर्गत सामायिक सुविधा केंद्र स्थापन करण्यात येत असल्याचे सांगितले. यासुविधेमुळे उच्च प्रतीच्या तांदुळाचे उत्पादन शक्य होऊन निर्यात वाढीस चालना मिळेल, असे सांगितले.

त्यानंतर माउली अगरबत्ती क्लस्टरचे श्री शिरीष निर्वाण यांनी अगरबत्ती निर्यात विषयी माहिती दिली. त्यांनी वार्षिक ३ ते ४ कोटी रुपयाचे निर्यात होतअसल्याचे सांगितले. परंतु सध्या अगरबत्ती उत्पादक जुन्या पद्धतीचे तंत्रज्ञान वापर करीत आहेत, तेव्हा त्यांना प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध करून दिल्यास निर्यातीत वाढ होईल, असे सांगितले. करिता लाखांनी येथे

राज्यशासन पुरस्कृत महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह योजना अंतर्गत सामायिक सुविधा केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मंजुरीस पाठविण्यात येत असल्याचे सांगितले.

त्यानंतर श्री संभाजी चव्हाण, जॉईन्ट डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेड, नागपूर, यांनी निर्यात वाढीच्या दृष्टीने जिल्ह्याचा निर्यातकृती आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने करावयाच्या बाबीविषयी माहिती दिली व मार्गदर्शन केले. त्यांनी जिल्ह्यातील निर्यातक्षम उत्पादने ओळखून डिसेम्बर २०२० पूर्वी निर्यातकृती आराखडा तयार करण्याची सूचना केली.

त्यानंतर श्री के. बी. इरफाते, asistant director, MSME , नागपूर यांनी निर्यातदारांना मार्गदर्शन व मदतीकरिता MSME कार्यालयात स्थापन केलेल्या मदत केंद्राविषयी माहिती दिली.

सभेचे शेवटी मा. जिल्हाधिकारी यांनी भंडारा जिल्ह्यातील निर्यातीस चालना देण्याच्या दृष्टीने कृती आराखडा तयार करण्याविषयी मार्गदर्शन केले. मा. जिल्हाधिकारी यांनी निर्यातक्षम कृषी उत्पादनेओळखून त्यांचे निर्यात वाढीस कृषी उत्पादक कंपन्याना प्रोत्साहन करण्याची गरज प्रतिपादन केली. याशिवाय जिल्ह्यातील इतर निर्यातक्षम उत्पादने जसे मॅंगनीज, पितळी भांडे, वन उत्पादने इत्यादी ओळखून त्यांचे निर्यात वाढीस कृती आराखड्यामध्ये समावेश करण्याची सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी केली.

सभेचे शेवटी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा यांनी सभेत उपस्थित अधिकारी व मान्यवरांचेआभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

18/11/2020
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा

मा. जिल्हाधिकारी,
भंडारा